## वार्ता टिपण दि.२३/१२/२०१७

# मुंबई येथुन पुणे येथे येवून हाय प्रोफाईल सेक्स कॅन्डल करणारे आंतरराष्ट्रीय टोळीचा गुन्हे शाखेच्या दक्षिण गुंडा स्कॉडने केला पर्दाफाश

---

दिनांक २२/१२/२०१७ रोजी संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक पथक, दक्षिण विभागाचे इंनचार्ज पोलीस निरीक्षक राम राजमाने यांचे बातमीदारा कडून बातमी प्राप्त झाली की, मुंबई येथुन दोन स्त्रीया एजंट मॉडेलिंग करणा-या मुली व परदेशी मुलीना घेवुन वेश्याव्यवसायासाठी पुणे येथे येत असतात. तसेच त्या आज रोजी सुध्दा पुणे येथे येणार आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळालेने, पो निरी राम राजमाने यांनी वरिष्ठां बरोबर संपर्क साधुन, त्यांना प्राप्त बातमी सांगितली असता, वरीष्ठांनी पुर्णपणे खात्री करुन, बातमीचे ठिकाणी छापा मारुन, योग्य ती कारवाई करणे बाबत सुचना दिल्या. दिलेल्या सुचना प्रमाणे पो निरी राम राजमाने यांनी बनावट गि-हाईकाचे माध्यमातुन सदर स्त्रीयां बरोबर संपर्क साधला असता, त्यांनी बनावट गि-हाईकास रात्रौ २१.४५ ते २२.०० वाजण्याचे दरम्यान हॉटेल ऑर्चिड समोरील चौकामध्ये ओव्हर ब्रिज खाली येत असलेचे सांगुन सदर ठिकाणी येणे बाबत बनावट गि-हाईकास कळविले. त्याप्रमाणे पो निरी राम राजमाने यांनी गुंडा स्वॉड कडी स्टाफ व हिंजवडी पोलीस स्टेशनचे व पो निरी अरुण वायकर व त्यांचा स्टाफ अशी संयुक्त टिम बनवुन, सदर ठिकाणी सापळा रचला असता, रात्रौ २२.०५ वा बातमीचे ठिकाणी एम एच १२/ ई एच १६२५ हिचेमधुन दोन स्त्रीया व एक मुलगी असे आले व त्यापाठोपाठ एका कार मधुन तीन मुली आल्या. सदर स्त्रीयांजवळ बनावट गि-हाईकाने जावुन चौकशी करुन, खात्रीकरुन ठरलेला इशारा पोलीसांना केला. इशारा होताच पोलीस पथकाने . मधु रिकाडो स्मिथ, वय ५८, रा. पारफ्यू बिल्डींग, फ्लॅट नं २०१, गॅरी रोड, गुलमोहर गार्डन मागे, अंधेरी वेस्ट, मुंबई १६, २. सोनिया जिवनलाल बधवाना, वय ४२, रा ४ बंगला, टेलीफोन एक्सचेंज, १३ नंबर डी ४ अंधेरी वेस्ट, मुंबई या स्त्रीयांसह दोन मॉडेल काम करणा-या भारतीय मुली, एक उजबेकीस्तान देशाची रहिवासी असलेली मुलगी व एक रशियन रहिवासी असलेली मुलगी यांना ताब्यात घेवून, वरील दोन्ही दलाल महिलांवर भा द वि कलम ३७०, ३७० (अ)(२) सह इटपा ॲक्ट कलम ४,५ प्रमाणे कारवाई करुन, त्यांचेविरुध्द हिंजवडी पो स्टे गुन्हा रजि नंबर ५६४/२०१७ अन्वये गुन्हा

नोंदविण्यात आलेला आहे. तसेच त्यांना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांची दिनांक २७/१२/२०१७ रोजी पर्यत पोलीस कस्टडीची रिमांड दिली आहे.

यातील महिला एजंटाकडे प्राथमिक चौकशी करता, ते फ्रि लान्स इव्हेट मॅनेजमेंटचे काम करतात. त्या दरम्यान नव्याने मॉडेलिंग क्षेत्रात पदार्पण करणा-या मॉडेल्स, स्ट्रगलिंग करणा-या मॉडेल, तसेच अर्थिक अडचणीत सापडलेल्या मॉडेल यांचेशी संपर्क साधुन, त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेवुन त्याचेंकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जातो. सदरच्या व्यवसायत यातील दलाल हे तारांकित हॉटेललाच प्राधान्य देतात. तसेच त्या शिवाय उच्च दर्जाची दारु, सिगारेट इत्यांदीची व्यवस्था मुलगी घेवून जाणारे ग्राहकाला करावी लागते. तसेच ग्राहकाला त्याचे नांवावर रुम आरक्षित करुन, सदर हॉटेलचे नांव व रुम नंबर एजंटला कळवावे लागते. परदेशी मुली यांना टयुरिस्ट व्हिजाची व्यवस्था करुन, त्यांना भारतामध्ये बोलावुन घेतले जाते व त्यांचेकडून सदरचा व्यवसाय करुन घेतला जातो. यातील मॉडेलचे दर अल्पकालावधी साठी लाखों रुपयांत आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त,गुन्हे. श्री.समीर शेख, सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, पो निरी अरुण वायकर, हिंजवडी पो स्टे, म. सहा पो निरी शितल भालेकर, वैशाली धुमाळ, सहा पो उप निरी राजाराम सुर्वे, राजेंद्रसिंग चौहान, रविंद्र कदम, शंकर जाभळे, प्रशांत पवार, गणेश साळुकें, प्रविण तापकिर, रमेश चौधर, प्रविण पडवळ, कैलास साळुंके, अजय उत्तेकर, विवेक जाधव, किरण ठवरे, राकेश खुणवे, पो ना कुंभार, पो शि मोरे, म पो ना चांदगुडे, पागिरे यांनी केली आहे.